**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** कासारवडवली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0994 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/06/2024 17:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | ४२० |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ४०६ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ३२३ |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | ५०४ |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | 506(2) |
| 6 | भारतीय दंड संहिता १८६० | ३४ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/01/2016

**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/12/2023

**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/06/2024 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/06/2024 17:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मौजे कावेसर, कासारवडवली ,जी बी रोड ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हरिश्चंद्र दादु पाटील

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** दादु पाटील

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1934

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 105 C,आकार रेसिडन्सी, TJSB बँकेजवळ,घोडबंदर रोड ठाणे, कासारवडवली ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 105 C,आकार रेसिडन्सी, TJSB बँकेजवळ,घोडबंदर रोड ठाणे, कासारवडवली ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संध्या दशरथ पाटील | | | 1. ठाणे,कासारवडवली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | दशरथ पाटील | | | 1. ठाणे,कासारवडवली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | विनोद दशरथ पाटील | | | 1. ठाणे,कासारवडवली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 4 | पिंटु दशरथ पाटील | | | 1. ठाणे,कासारवडवली ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | दागिने/आभूषण | इतर सोन्याचे दागिने | साक्षीदार यांचे 70 तोळे सोन्याचे दागीने | 4,900,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | टि.जे.एस.बी. व सारस्वत या बंक खात्यातील अंदाजे रू. 3,00,00,000/ ( तिन करोड ) | 30,000,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | कुण 13 सदनिका परस्पर विक्री व स्वतःकडे हस्तांतरीत करून | 58,800,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

93,700,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हरिश्चंद्र दादु पाटील, वय 90 वर्षे, व्यवसाय निवृत्त, रा. फ्लॅट क्रं. 105, सि. विंग, आकार रेसीडेन्सी, टि. जे. एस. बी. बँकेजवळ, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम) समक्ष विचारले वरून सांगतो की,

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर माझी पत्नी, मुलगा तानाजी व त्याचे कुटंबासह राहावयास आहे. मला प्रकाश, चंद्रकांत, तानाजी असे तिन मुलं व रूक्मिणी, संध्या व सविता अशी तिन मुली असून सर्व विवाहित असून ते त्यांचे कुटुंबियासह राहतात. मौजे कावेसर, ठाणे या गावात सर्वे क्रं. 199, 213, 214 मध्ये वडीलोपार्जीत जमीन होती, ती आम्ही विकासकाला विकसीत करण्यासाठी दिली होती. त्यातुन आमचे हिश्याला आलेल्या मालमत्तेतुन मिळणा-या उत्पन्नावर आम्ही आमचा उदरनिर्वाह करतो.

सन 2007 मध्ये मौजे कावेसर मध्ये असलेल्या माझे मालकीचे व वडीलोपार्जीत सर्वे क्रं. 199, 213, 214 मधील मालमत्तेचे विकसन करण्याकरीता मे. आकार डेव्हलपर्स, ठाणे यांचेसोबत करार केला आला होता. त्याप्रमाणे सन 2015 मध्ये मे. आकार डेव्हलपर्स यांनी ठाणे महानगरपालीका अंतर्गत मौजे कावेसर सर्वे क्रं. 199, 213 व 214 मधील एकुण क्षेत्रफळापैकी 14,430 स्क्वेअर मिटर क्षेत्रफळामध्ये रहिवासा करीता इमारती विकसीत केल्या होत्या. मे. आकार डेव्हलपर्स, ठाणे या विकासकाने सदर विकसीत इमारतीपैकी विंग 'सि' मधील एकुण 31 सदनिका व विंग 'डी' मधील 21 सदनिका उप निबंधक कार्यालय, ठाणे दस्त क्रं. 8117/2015, दिनांक 23/11/2015 प्रमाणे नोंदणीकृत कराराप्रमाणे माझे नावे हस्तांतरीत केल्या होत्या. माझे नांवे प्राप्त झालेल्या मालमत्तेपैकी मी माझे मुला-मुलींना देण्याचे, पैकी काही विक्री करण्याचे व उर्वरीत मी माझेकडे ठेवण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे मुलगा प्रकाश पाटील यास 09 सदनिका, चंद्रकांत पाटील यास 10 सदनिका, तानाजी पाटील यास 11 सदनिका, मुलगी रूक्मिणी पाटील हिस 02 सदनिका, सविता ठाकुर हिस 02 सदनिका व संध्या पाटील हिस 02 सदनिका असे बक्षीसपत्राप्रमाणे दिल्या होत्या उर्वरीत सदनिकांपैकी काही स्वतः साठी व इतर विक्री साठी स्वतःकडेच ठेवल्या होत्या.

सन 2016 मध्ये माझी मुलगी श्रीमती संध्या दशरथ पाटील हि मला व माझे पत्नीला वाघबीळ येथील तिचे राहते घरी कायमस्वरूपी राहावयास घेउन गेली होती. आम्ही तिचे घरी गेलो होतो त्यावेळी माझे पत्नीचे 70 तोळे सोन्याचे दागीने, सहा लाख रूपये, माझे कडील बँक खात्यांचे चेक बुक, पास बुक व इतर आवश्यक कागदपत्रे सोबत घेउन आलो होतो. आम्ही दोघे पती-पत्नी तिचे घरी काही दिवस सुव्यवस्थित राहत होतो. काही दिवसांनी मुलगी संध्या पाटील व तिच्या कुटुंबियांनी माझे मालकीचे सदनिकांपैकी चार सदनिका बक्षीसपत्राव्दारे तिच्या नावे करण्याचा

तगादा लावला, परंतु या प्रस्तावास मी व माझे पती यांनी विरोध दर्शविला होता.

तरी सुध्दा दि. 11/01/2016 रोजी मुलगी संध्या पाटील हिने मला ठाणे निबंधक कार्यालयात घेउन गेली होती. तेथे एका इंग्रजी भाषेत छापलेल्या काही दस्तांवर माझ्या सहया घेतल्या होत्या. मी हया सहया कशासाठी घेत आहेत असे विचारले असता मुलगी संध्या व नातु विनोद यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली होती. काही दिवसांनी मला समजले की, दि. 11/01/2016 रोजी ठाणे रजिस्ट्रेशन कार्यालयात नोंदणी केलेले दस्त क्रं. 7262/2016 प्रमाणे नातु विनोद दशरथ पाटील याचे नावे मी कुलमुख्त्यारपत्र तयार करून दिले आहे. जेणेकरून माझे मालमत्तेसंबंधीचा पुर्ण अधिकार नातु विनोद पाटील याचेकडे राहील. परंतु माझी अशी कोणतीही इच्छा नसतांना मुलगी संध्या व तिचे कुटुंबियांनी मला न कळू देता कुलमुख्त्यारपत्र तयार करून घेतले होते. त्यानंतर दि. 22/02/2016 रोजी मुलगी संध्या पाटील हिने दस्त क्रं. 2465/2016 प्रमाणे पुन्हा एकदा मला कळवा रजिस्ट्रेशन कार्यालयात घेउन जाउन तेथे सुध्दा इंग्रजी दस्तावर सहया घेतल्या होत्या. याबाबत विचारपुस करता पुन्हा त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली होती. त्यानंतर काही दिवसांनी मला समजले की, मुलगी संध्या पाटील व तिचे कुटुंबियांनी माझे दस्तवर सहया घेतलेले दस्त हे माझे तर्फे बक्षीसपत्र असून त्याव्दारे तिने माझे नावांवरील सी व डी विंग मधील 10 सदनिका तिचे नावावर करून घेतल्या व माझा नातु विनोद पाटील याने कुलमुख्त्यारपत्राचा गैरवापर करून 3 सदनिका विकल्या आहे. तसेच माझे मालकीच्या सदनिकाचे जे भाडे यायचे ते सुध्दा मला न सांगता माझ्या सहया घेवुन माझ्या खात्यातुन काढुन घ्यायचे. तसेच माझे आधारकार्ड, पॅनकार्ड, व इतर कागदपत्र त्यांच्या कब्जात होते त्याचा सुध्दा त्यांनी गैरवापर केला आहे. नातु विनोद दशरथ पाटील याने कुलमुख्त्यारपत्राव्दारे माझे नांवे असलेले फ्लॅट कोणा कोणाला विक्री/हस्तांतरीत केले याबाबत विचारणा केली असता मला काहीच माहिती दिली नाही व उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली. मी मुलगी संध्या पाटील हिचे घरी वास्तव्यास असतांना माझे बँक पास बुक, चेक बुक ज्यावर त्यांनी माझ्या सहया करून घेतल्या होत्या ते सर्व त्यांनी त्यांचे कब्जात ठेवले होते. त्याबाबत त्यांनी काय केले याबाबत विचारणा केली असता सुध्दा त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. माझी मुलगी संध्या पाटील, माझे जावई दशरथ पाटील, नातु विनोद पाटील, पिंटु पाटील हे कोणतेही कामधंदा करीत नाहीत. त्यांनी माझे जी. पी. पारसीक बँक शाखा कासारवडवली खाते क्रं. 018/1673, जी. पी. पारसीक बँक शाखा वाघबीळ खाते क्रं. 018/907, टि. जे. एस. बी. बँक शाखा वाघबीळ खाते क्रं. 22SB/3773 तसेच सारस्वत बँक खाते क्रं. 108203100003540 या वेगवगेळया खात्यांमधील अंदाजे तिन करोड रूपये मला न कळवता परस्पर काढून त्याचा अपहार केला आहे तसेच ज्यांचेशी माझा संबंध नाही अशा व्यक्तिंनाही हस्तांतरीत केले आहे. माझे जावई यांचे बंधु मधुकर पाटील हे सुध्दा कोणतेही कामधंदा करीत नसल्याचे मला माहित आहे, माझे बँक खात्यातील काही रक्कम मधुकर पाटील व त्याचे कुटुंबातील सदस्यांना सुध्दा मला न कळविता हस्तांतरीत केल्याचे मला समजले आहे. माझे पत्नीचे 70 तोळे सोने सुध्दा मुलगी संध्या हिने तिचे कब्जात ठेवले होते, त्याबाबत तिला विचारपुस करता ते तिचेच असल्याचे सांगून पत्नीला परत केले नाही. आम्ही तेथून निघतांना तिने सोन्याचे दागीन्यांपैकी काही दागीने पत्नीला दिले होते. परंतु त्याबाबत संशय आल्याने आम्ही त्याची सोनाराकडून खात्री केली असता ते नकली असल्याचे समजले. या सर्व बाबींचा मी व माझी पत्नी मुलगी संध्या व तिचे कुटुंबियास वारंवार विचारणा करीत असल्याने त्याचा राग येउन त्यांनी मला व माझे पत्नीला वेळोवेळी शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच एक वेळ मुलगी संध्या हिने माझे पत्नीचा गळा आवळण्याचा प्रयत्न केला होता. तसेच आम्ही जर या गोष्टी इतर कोणाला सांगीतल्यातर आम्हाला जिवे ठार करण्याची धमकी सुध्दा दिली होती. या गोष्टींना त्रस्त होवून आम्ही वयोवृध्द पती पत्नी पुन्हा मुलगा तानाजी याचे कुटुंबासोबत राहावयास आलो आहोत. यावरून मुलगी संध्या व तिचे कुटुंबियांनी संगनमत करून मला व माझे पतीला तिचे घरी वास्तव्यास नेउन माझे मालमत्तेचा व पैशाचा अपहार करून आमची फसवणुक केली.

तरी मुलगी संध्या दशरथ पाटील, जावई दशरथ पाटील, नातु विनोद दशरथ पाटील व पिंटु दशरथ पाटील यांनी व इतरांनी आपआपसात संगनमत करून सन 2016 ते 2023 दरम्यान आम्हाला त्यांचे घरी वास्तव्यास घेउन जाउन त्या दरम्यान जबरदस्तीने कुलमुख्त्यारपत्र तयार करून त्याव्दारे मौजे कावेसर येथील माझे मालमत्तेचा मे. आकार डेव्हलपर्स यांनी विकसन करून हस्तांतरीत केलेल्या सदनिकांपैकी एकुण 13 सदनिकां परस्पर विक्री व स्वतःकडे हस्तांतरीत करून रू. 5,88,00,000/- ( पाच करोड अठ्याएंशी लाख रूपयांची ), माझे जी. पी. पारसीक, टि.जे.एस.बी. व सारस्वत या बँक खात्यातील अंदाजे रू. 3,00,00,000/- ( तिन करोड ) च्या रक्कमा परस्पर वर्ग करून, तसेच माझे पत्नीचे 70 तोळे सोन्याचे दागीने आम्हाला परत न करता त्याऐवजी काही नकली दागीने देउन अंदाजे रू. 49,00,000/- ( एकोणपन्नास लाख ) ची अशी एकुण रू. 9,37,00,000/- ( नउ करोड सदोत्तीस लाख रूपयांची ) रूपयांची फसवणुक केली आहे. आम्ही पती पत्नी त्यांना वारंवार वर नमुद गोष्टींसाठी विचारणा केली असता आम्हाला मारहाण करून शिवीगाळ केली आणि इतर कोणाला सांगीतल्यास जिवे

ठार मारण्याची धमकी दिली करीता त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याची तक्रार आहे.

माझा वरील जबाब माझे सांगण्याप्रमाणे मराठीत टंकलिखीत केला असून तो मला वाचून दाखविण्यात आला तो बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sunil dattatray patil(I (Inspector)) / 100 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sunil dattatray patil

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 100

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 4 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**